अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

आरंभ

MO.9860898564

संपादक - दिपक थोरात

छगन भुजबळ यांची हिंगोलीमधील सभा उधळून लावण्याचा इशारा; नांदेड विमानतळावर चोख बंदोबस्त

मुंबईः मराठवाड्यातल्या हिंगोली येथे रविवारी ओबीसी मेळावा आयोजित करण्यात आलेला आहे. परंतु हा मेळावा उधळून लावण्याचा इशारा स्वराज्य संघटनेने दिला आहे.'टीव्ही ९ मराठी'ने यासंदर्भातील वृत्त दिले आहे. स्वराज्य संघटनेने सभा उधळून लावण्याचा इशारा दिल्याने सभास्थळी आणि नांदेड विमानतळावर मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आलेला आहे. सकाळी १० वाजता नांदेड विमानतळावर छगन भुजबळ यांचं आगमन होणार आहे. जालना येथील सभेमध्ये त्यांनी केलेल्या आक्रमक भाषणामुळे ओबीसी नेत्यांनीही नाराजी व्यक्त केली होती. त्यामुळे आज (रविवारी) भुजबळ काय बोलणार?, याकडे सर्वांचं लक्ष लागून राहिलं आहे.दरम्यान, विजय वडेट्टीवार यांनी शनिवारी सभेसाठी जाणार असल्याचं जाहीर केलं होतं. परंतु रविवारी ते हैदराबादकडे रवाना झाले आहेत. छगन भुजबळ हे नांदेडवरुन कारने हिंगोलीकडे रवाना होणार आहेत. मागच्या काही दिवसांपासून भुजबळांच्या भाषणावर नाराजी जाहीर झाली होती. अजित पवार यांनीही समज दिल्याचं खुद्द भुजबळांनी कबूल केलं. त्यामुळे भुजबळ आज सौम्य भूमिका घेतात का, हे बघावं लागेल.

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०१ | अंक -६७ | रविवार दि.२६ नोव्हेंबर २०२३ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४

Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -67 | SUNDAY DT.26 NOVEMBER 2023 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बीड जिल्हा दौरा का टाळला?

बीडच्या क्षीरसागर सोळंकेसह जाळपोळीची कुंडली माहित होती ?



आ. रोहित पवार, संदिप क्षिरसागर यानी एका पत्रकार परिषदेत सतेतल्या माणसाचा हात आहे. असा आरोपा केला होता.त्या प्रश्नाचे उत्तर मुख्यमंत्री महोदयांना द्यायचं नव्हते का?

आपल्याचं पक्षातील लोकांनमुळं दौरा रद्द झाल्याच्या चर्चाना उद्यान?

जाळपोळ प्रकरणातील आरोपी माहीत असल्यामुळेच मुख्यमंत्र्यांनी दौरा रद्द केला चर्चेला उधाण?

बीड ।प्रतिनिधी

३० ऑक्टोबर रोजी मराठा आंदोलनाच्या दरम्यान बीड शहरात झालेल्या जाळपोळ प्रकरणातील मास्टरमाईंड अर्थात मुख्य सूत्रधार माहीत असल्यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अन्यमंत्र्यांनी दौरे रद्द केल्याची माहिती हाती आली असून जाळपोळ प्रकरणातील आरोपींना कधी अटक करणार आणि जनतेसमोर आणणार अशी प्रतिक्रिया उमटू लागली आहे.

तर राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना बीड जिल्ह्यातील सर्व कुंडली माहिती आहे यामध्ये आज बीडचा दौरावर होता तो मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी का पाळला तर बीडच्या जाळपोळीमध्ये कोणाचा हात आहे कोणत्या राजकीय पक्षाचा हात आहे ही पोलीस यंत्रणेमार्फत माहिती संबंधित गृहमंत्री व मुख्यमंत्री यांना गेली असेल ना. ची चर्चा आज बीड जिल्ह्यातील तसेच बीड शहरांमध्ये हॉटेल पत्रकार नेतेमंडळी विरोधी पक्षनेते सर्व पक्षातील कार्यकर्ते व सर्वसामान्य नागरिकांमध्ये आलेला आहे तर यामध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना बीडच्या जाळपोळीची व क्षीरसागर , सोळंके यांच्या बंगल्यासह शिवसेना, भाजपाच्या जिल्हाध्यक्षाचे कार्यालय आंदोलकांनी जाळले आहेत. या मध्ये नक्कीच एकनाथ शिंदे यांना विरोधकांना व पत्रकारांना उत्तर द्यावे लागले असते म्हणून आज बीडचा त्यांनी रद्द केलेला आहे व सर्व बीड जिल्ह्यातील जाळपोळीची कुंडली ही मुख्यमंत्री व गृहमंत्री यांना नक्कीच माहिती आहे अशी चर्चा नागरिकांमध्ये आज या ठिकाणी पाहायला मिळत आहे.

आज मनमत स्वामी यांच्या महापूजेसाठी शासकीय महापूजेचा मानकरी म्हणून मुख्यमंत्री यांच्या हस्ते आज पूजा ठेवण्यात आली होती शिवा संघटनेचे मनोहर धोंडे यांनी काल पत्रकार परिषद घेऊन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे बीडला येणार नाहीत अशी घोषणा केली तर यावेळी त्यांच्यासोबत शिवसेनेचे माजी मंत्री सुरेश नवले व विद्यमान जिल्हाध्यक्ष सचिन मुळूक हे उपस्थित होते सचिन म्हणून हे शिवसेनेचे व एकनाथ शिंदे यांचे विश्वासू व जवळचे समजले जाते कारण की दुसऱ्या जिल्हाध्यक्षांनी यावेळी पत्रकार परिषद घेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे येणार म्हणजे येणार असे सांगितले होते तर या ठिकाणी माजी मंत्री सुरेश विद्यमान जिल्हाप्रमुख यांनी सांगितले होते की मुख्यमंत्री बीडला येणार नाहीत कारण यामध्ये जवळचा निकटवर्ती म्हणून यांच्याकडे पाहिले जाते तर माजी राज्यमंत्री सुरेश नवले हे एकनाथ शिंदे यांचे जवळचे मित्र असल्यामुळे यांना सविस्तर माहिती होती की एकनाथ शिंदे हे या कार्यक्रमाला येणार नाहीत व प्राध्यापक मनोहर धोंडे यांना सुद्धा कल्पना होती की एकनाथ शिंदे हे बीडला येणार नाहीत म्हणून त्यांनी पत्रकार परिषद ही माजी मंत्री सुरेश नवले यांच्या कार्यालयामध्ये काल घेण्यात आली

विद्यमान जिल्हाप्रमुख पुंडलिक खांडे यांनी सांगितले होते की १००% मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब बीडला शासकीय महापूजेसाठी येणार आहेत व यावेळी मनमत स्वामी मठाचे व संस्थांचे काही महाराज लोक सुद्धा त्या ठिकाणी संस्थांचे महंत महाराज सोबत होते यावेळी खांडे यांनी डंके की चोट पर सांगितलं होतं की मुख्यमंत्री उद्या येणार आहेत परंतु कदाचित दौरा रद्द करण्यात आला आहे यामुळे जवळचा आणि लांबचा जिल्हाप्रमुख व शिंदे साहेबांचा निकट वरती कोण आहे म्हणून सुद्धा बीड जिल्ह्यातील चर्चेला उदार आलेले आहे अशी विश्वसनीय सूत्रांनी माहिती सांगितली आहे.

तर हा दौरा शिवसेनेच्याच काही पदाधिकाऱ्यांमुळे रद्द झाला असल्याची चर्चा बीड जिल्ह्यासह मराठवाड्याची आहे यामध्ये आज सुद्धा बीड प्रकरणांमध्ये मुख्यमंत्र्यांना उत्तर देता वेळेस काय उत्तर द्यावे पत्रकार विरोधी पक्षातील नेत्यांना व बीड जिल्ह्यातील जनतेला म्हणून त्या ठिकाणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बीडला न येणे पसंत केले यामुळे शिवसेनेच्या गटांमध्ये खळबळ उडाली आहे.

आज बीड जिल्ह्यामध्ये येत असताना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर आमदार संदीप शिरसागर व सत्तेमध्ये सामील असलेले राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रवादी गटाचे युवा नेते योगेश क्षीरसागर तसेच भाजपाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांना विचारात घेऊनच मुख्यमंत्री यांनी बीडला येणे वसंत केले असेल अशी ही चर्चा आज बीड जिल्ह्यातील जनतेमध्ये हॉटेल परिसर नेते मंडळी पत्रकार यांच्यामधील जोराने चालू आहे तर या ठिकाणी स्व पक्षाच्या कार्यकर्त्या सुद्धा ही चर्चा आहे म्हणून सविस्तर माहिती ही बीड जिल्ह्यातील जनतेला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे येथील का व आज सुद्धा बीड जिल्ह्यातील जनतेला काय उत्तर द्यावे हे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना नसल्यामुळे त्यांनी संबंधितावर रद्द केला आहे तसेच शिवसेनेतील पक्षातील कार्यकर्ते नाराजगड व वैयक्तिक सोडून शेवटी घरापर्यंत आल्या त्यानंतर सर्व राजकीय नेते व मंडळी एकत्र बसून विचारविनिमय करून स्वतःची राजकीय पोळी भाजून घेत आहेत तर यामध्ये आज सुद्धा मुख्यमंत्र्यांचा एक गोष्ट बीड जिल्ह्यातील चर्चेचा विषय ठरला आहे.

राष्ट्रवादी युवा नेते शरद पवार गटाचे आमदार संदीप क्षीरसागर यांचाही घर जाळपोळून प्रकरणांमध्ये करण्यात आले होते तर दिवाळीच्या पाडव्यानिमित्त राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार हे बीडला आले असताना त्यांनी पत्रकार परिषदेमध्ये जाहीर रित्या सांगितले की बीडच्या जाळपोळीमध्ये बीड जिल्ह्यातील व महाराष्ट्र सरकार मधील एक ते दोन नेते आहेत ते एक ते दोन नेते कोण आहेत याचे उत्तर कदाचित मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना माहिती नसेल किंवा त्यांना या ठिकाणी उत्तर देण्याची इच्छा व मानसिकता नसेल व बीड जिल्ह्यामध्ये आज सुद्धा जाळपोळीच्या ठिकाणी घटना घडल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज बीड साठी काय बोलावे यामुळे व काही स्व पक्षातील नेते मंडळींमुळे दौरा रद्द केल्याची चर्चा बीड जिल्ह्यामध्ये आहे या ठिकाणी विश्वासने सूत्रांची माहिती व बीड जिल्ह्यातील कालाकोपऱ्यामध्ये जनतेच्या पत्रकारांच्या अधिकारी कर्मचारी व पोलीस प्रशासनाला सुद्धा ही गोष्ट माहिती होती की मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे बीडला येणार नाही म्हणून रद्द केला आहे.

काही दिवसावर येऊन ठेपलेल्या मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री यांचा शासन शासन आपल्या दारी नियोजित दौऱ्याबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व मुख्यमंत्री फडवणीस देवेंद्र जी आजी दादा पवार यांनी येत असताना जाळपोळ प्रकरणाशी काही संबंध नसावा व परळीला बीड पासून शंभर किलोमीटर अंतरावरती शासन आपला दारी हा कार्यक्रम नियोजन समाजातील सर्व नियोजन हे करण्यात आले आहे राजकीय वातावरण तापले आहे लोकांच्या पत्रकारांच्या नेत्यांच्या मनात आहे.

मराठा आंदोलनाकासाठी जरांगे पाटील यांनी आक्रमक पवित्रा घेत आज महाराष्ट्रामध्ये एक वेगळ्या पद्धतीने आक्रमक महाराष्ट्रामध्ये नेतृत्व करत गोरगरीब मराठा बांधवांना आरक्षण मिळावे यासाठी आक्रमक पवित्रा घेतला आहे यामध्ये संबंधित मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री तसेच सर्व पालकमंत्री महाराष्ट्रातील जिल्ह्याचे यांना व सर्व पक्ष नेत्यांना मनोज रंगे पाटील यांनी गाव बंदीचे आदेश काढल्यानंतर सर्व समाज बांधव त्यांच्या पाठीशी उभा राहत असताना या ठिकाणी जरांगे पाटील यांना मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत आहे याचाच एक भाग म्हणून सुद्धा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज बीड जिल्हा दौरा रद्द केला आहे अशी चर्चा दबक्या आवाजात बीड शहरातील हॉटेल अधिकारी कर्मचारी सर्व शासकीय कार्यालय व राष्ट्रीय फिरणारा सर्वसामान्य माणूस पत्रकार पोलीस प्रशासन यांच्या

संबंधित प्रकरणी बीड जाळपोळ झाल्यानंतर बीडचे पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडरकर, डी वाय एस पी वाळके संतोष जी एलसीबी संतोषजी साबळे यांच्यासह अनेक कर्मचारी अधिकारी यांनी संबंधित प्रकरणी अनेक जणांना अटक करत जवळपास हा तपास पूर्ण करत आहेत यामध्ये काही सत्तेतल्या जिल्हाध्यक्षांच्या नातेवाईकांसह काही विरोधी पक्षातील जिल्हाध्यक्ष वेगवेगळ्या पक्षातील नेते मंडळी कार्यकर्ते वेगवेगळ्या जाती धर्मातील नागरिक या जाळपोळीमध्ये अटक करण्यात आलेले आहेत संबंधित जाळपोळीची कुंडली ही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना माहिती होती म्हणून तर त्यांनी बीडचा दौरा टाळला तर नाही ना अशी चर्चा बीड शहरामध्ये आज चर्चेला उदान बनले आहे.

विरोधकांना काय उत्तर देणार यामुळे दौरा रद्द करा?

पत्रकार परिषद घेईपर्यंत शिवाचार्यसह मुख्यमंत्र्यांचे निकटवर्तीय अंधारातच

गोष्टी गेल्या त्या प्रमुख कारणामुळे त्यांनी कपिलधार येथील त्या कार्यक्रमाला न देण्याचा निर्णय २२ नोव्हेंबर रोजीच घेतला होता. मात्र २५ नोव्हेंबर रोजी दुपारी दोन वाजेपर्यंत पत्रकार परिषद घेईपर्यंत किंबहुना पत्रकार परिषद झाल्यानंतर सुद्धा या धर्मसभेचे मुख्य आयोजक तमाम सर्व शिवाचार्य यांच्यासह गुरुवयांच्या सभेचे मुख्य आयोजक मुख्यमंत्र्यांचे निकटवतीय समजले जामाने सईद खान यांच्यासह मुख्यमंत्र्यांचे अत्यंत विश्वासू बाजीराव चव्हाण तसेच कुंडलिक खाडे यांना दौरा रद्द झाला असल्याबाबत कसलीच माहिती नव्हती ते मुख्यांमत्र्याच्या दौरा संदर्भात अंधारातच होते. त्यामुळे आता मुख्यमंत्र्यांच्या किती निकटवतीय राहिलेले आहेत .याबद्दल तर्क वितर्क होत आहेत मुख्यमंत्र्यांचे प्रतिनिधी महासून मंत्री दीपक केसरकर येणार आहेत. मात्र यांच्या शासकीय दीयात कुठेच धर्मसभा अथवा बीड येथील आयोजित विविध कार्यक्रमांच्या उपस्थिती बाबत उलेख नाही. त्यामुळे उलट सुलट चर्षेला उधान आले आहे.

सालेहचा १५ हजारांसाठी आतेभावाकडूनच खून

घनसावंगीतील खुनाचे गूढ उकलले, वडिलांच्या तक्रारीनंतर मृतदेह उकरून पोलिसांनी केला तपास

छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी

नारेगाव परिसरातील तरुणाचा घनसावंगीत खून झाला होता. या प्रकरणाचा उलगडा झाला आहे. सालेह फरहान हिलाबी (१९, रा. नारेगाव) याचा सालेह मोईद या आतेभावानेच खून केल्याचे उघड झाले. मे महिन्यात घेतलेले १५ हजार रुपये परत न दिल्याने गळ्यावर धारदार शस्त्राने वार करून सालेह हिलाबीला संपवण्यात आले. याबाबत पोलिसांना न कळवल्याने आरोपीचे वडील, चुलता यांच्यासह अन्य सात जणांवर गुन्हा दाखल केला. घनसावंगी येथील देवनगर येथे सालेह फरहान हिलाबी हा आत्याकडे आला होता. १७ नोव्हेंबर रोजी रात्री ८ वाजता मुख्य आरोपी असलेला सालेह मोईद याने धारदार हत्याराने गळा, चेहऱ्यावर वार करुन त्याचा खून केला. यानंतर त्याने गळ्यावर वार करून घेत आत्महत्या केली, असा बनावही केला होता. यानंतर त्याच्या कुटुंबीयांना माहिती देऊन त्याच रात्री ३.३० वाजता दफनविधी केला.

खुनानंतर आरोपींनी पोलिसांचा ससेमिरा मागे लागू नये, म्हणून अवघ्या साडेसात तासांतच पुरावा मिटवण्याचा प्रयत्न केला. १७ नोव्हेंबर रोजी रात्री ८ वाजता खून केला. नंतर ११ वाजेपर्यंत संभाजीनगर येथील नारेगाव येथे मृतदेह आणण्यात आला. येथे अवघ्या ४ तासांतच पहाटे ३.३० वाजेच्या सुमारास दफनविधी केला.

मृताचे वडील, चुलताही आरोपी

घटनेची माहिती मिळताच वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली मृतदेह उकरून तपास केला. यात मृताचा खून झाल्याचे पुढे आले. १५ हजार रुपयांच्या वादातून खून केल्याचे स्पष्ट झाले. पोलिसांना तत्काळ माहिती न दिल्यामुळे मृताचे वडील व चुलते यांनाही आरोपी केले आहे. प्रदीप डोलारे, पीएसआय, घनसावंगी.

चैन ,मौजमस्ती, म्हणजे आयुष्य या मानसिकतेतून आजची तरुणाई बाहेर निघायला तयार नाही

शिक्षणाच्या नावाखाली आपली मुलं नशेच्या दुनियेत नाहीत याची खात्री दक्षता काळजी पालकांनी वारंवार घेतली पाहिजे. नशेच्या दुनियेत प्रवेश आहे पण पुन्हा तिथुन परत येणे पुन्हा जवळपास शक्य होत नाही. त्या मुळे जीवन उदयाला येण्या अगोदरच भविष्य संपुष्टात येऊ नये हि काळजी पालकांनी घेतली पाहिजे. ह्या भयानक चक्रव्युहात आपली मुलं अलगद सापडणार नाहीत यासाठी आता प्रयत्न होण गरजेच आहे.या चक्रव्युहात एकदा प्रवेश केल्यानंतर बाहेर पडण्याची शक्यता फार धुसर असते .देशाचं भविष्य समाजाचं वैभव असणारी तरूणाई आज स्वतःच अस्तित्व घडविण्यासाठी संघर्ष करण्या ऐवजी नशेच्या दुनियेत स्वतःच अस्तित्व शोधत आहे.नशा हि विघातकच आहे. स्वतःसाठी, कुटुंबासाठी, समाजासाठी, देशासाठी पण याचा चक्क मुलांना विसर पडला आहे. स्वतःच आयुष्य स्वतः उध्वस्त करण्यासाठी जणुकाही स्पर्धा लागली आहे. डोळ्यासमोर पाहु वाटणार नाही अशा पद्धतीने विकृती घडत आहेत.या नशेच्या चक्रव्युहात मुलं कशी अडकतात हे त्यांना स्वतःला सुद्धा कळत नाही. हा नशेचा विळखा एवढा प्रचंड मोठा आहे की त्याच वास्तव स्वरूप समोर आले तर अनेक पालकांचे पाय जमिनीवर उभा राहणार नाहीत.एवढी कठिण आणि बिकट परिस्थिती निर्माण झाली आहे. आई वडील पालक यांची परिस्थिती त्यांचं स्वप्न याशी मुलांना फार काही देणं घेणं उरलेले नाही.जीवनाच उदिष्ट काय तर खा प्या आणि मजा करा या पलिकडे जीवन नाही हि संकल्पना रूढ होत असल्याने फक्त चैन ,मौजमस्ती, म्हणजे आयुष्य या मानसिकतेतून बाहेर निघायला तरूणाई तयार नाही. मुळात जीवन काय आणि कशासाठी हि मानसिकता बदलली पाहिजे.आपलं जीवन व्यर्थ वाया घालविण्यासाठी नक्कीच नाही याची जाणीव झाली पाहिजे.आपले पालक आपले शत्रु नाहीत.जोपर्यंत आपण जीवन समजण्यासाठी समर्थ नाहीत तोपर्यंत आई वडील पालक यांच्या आज्ञेत राहिल पाहिजे. जीवनातील छोटी मोठी प्रत्येक बाब आपल्या पालकांशी चर्चा केली तर जीवनात अनर्थ घडणार नाही.तसच कोणतीही हि विघातक शक्ति आपला प्रभाव आपल्यावर दाखवु शकणार नाही पण त्यासाठी आपण आपल्या पालकांच्या अज्ञेत राहिल पाहिजे. त्याच बरोबर आध्यत्मिक गोडी निर्माण करून आपल्या मुलांना संस्कार संस्कृती मुल्य जपणुक करण्या बाबत स्व इच्छेने प्रेरीत केलं पाहिजे.



रामभाऊ आवारे
प्रदेश कार्याध्यक्ष वारकरी मंच महाराष्ट्र राज्य

ज्ञान,नाम,शांती,वैराग्य आणि निष्ठा हीच संताची शिकवण - महंत श्रीराम महाराज विडेकर

केज । प्रतिनिधी
(सायं.दै.आरंभ)

साधू शिवरामपुरीजी महाराज मठ संस्थान विडा यांच्या वतिने श्री.क्षेत्र पंढरपुर येथे नविन नागनाथ सदन निवासाचा लोकार्पन ह.भ.प.महंत श्रीराम महाराज विडेकर यांच्या शुभहस्ते शुक्रवारी संपन्न झाला आहे.केज तालुक्यातील विडा येथिल साधू शिवरामपुरीजी महाराज मठ संस्थानचे मठाधिपती ह.भ.प.महंत श्रीराम महाराज विडेकर यांच्या संकल्पनेतून पंढरपुर येथे साकारलेल्या नागनाथ सदन भक्त निवासाचा लोकार्पन शुक्रवारी दु.१ वा मोठ्या उत्साहात पार पडला आहे.त्या निमित्ताने आयोजित केलेल्या तीन दिवसीय किर्तन महोत्सवाची सांगत ह.भ.प.श्रीराम महाराज विडेकर यांच्या किर्तनाने झाली.साधू शिवरामपुरीजी महाराज व नागेशपुरीजी महाराज यांचा महाराष्ट्रभर मोठा भक्त परिवार आहे.भक्तांना पंढरपूर येथे निवास असावा असा मानस ह.भ.प.वै.नागेशपुरीजी महाराज व ह.भ.प.वै. रामकृष्ण महाराज यांच्या चरणी व्यक्त केला होता तो मानस आपणा सर्वांनी तन,मन,धन, निष्ठा आणि श्रध्देने पूर्ण केल्याने आज आपणा सर्वांच्या उपस्थितीत नागनाथ सदन आपणा सर्वांना अर्पण करत आसल्याचे प्रतिपादन ह.भप.महंत श्रीराम महाराज विडेकर यांनी यावेळी केले आसून नागनाथ सदनाचे यशस्वी व्यवस्थापन करण्याचे आवाहन देखिल त्यांनी याप्रसंगी केले आहे.

पूर्ण केला पूर्ण केला पूर्ण केला मनोराथ । घरा आले घरा आलेघरा आले कृपाळू। सांभाळले सांभाळीलेसांभाळीले अनाथा। केला निळा केला निळाकेला निळा पावन। या संत निळोबाराय यांच्या अभंगावर निरूपण करताना त्यांनी संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींनी ज्ञानेश्वरीच्या माध्यमातून जगाला ज्ञानामृत दिले,संत नामदेव यांनी नामाचा महिमा वर्णन केला.संत एकनाथांनी शांतीचा संदेश दिला.जगद्गुरू तुकाराम महाराज यांनी वैराग्य तर संत निळोबाराय यांनी भगवंत आणि गुरू विषयी निष्ठेची शिकवण दिली असल्याचे त्यांनी म्हटले आहे.या प्रसंगी ह.भ.प.भगवान महाराज शास्त्री वरपगावकर,ह.प.भ.लक्ष्मण महाराज ईनामदार,ह.भ.प.केशव महाराज शास्त्री,ह.भ.प.पुरूषोत्तम महाराज शास्त्री,जेष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा,विडा गटाचे जि.प.सदस्य विजयकांत मुंडे,कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अंकुशराव इंगळे,सुनिल गलांडे,दत्तात्रय ठोंबरे,विलास जोगदंड,,धैर्यशील देशमुख,विजयकुमार पटाईत,गोपीनाथ महाराज,केदार महाराज, मृदंगाचार्य अरुण महाराज कदम,गणेश महाराज,दादा महाराज मेटे,केशव देशमुख, इंजिनियर बोरखडे,हारके सर,जगन्नाथ गुरूजी,शेखर पाटील,काकासाहेब पाटील बोरगावकर आदी मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सरपंच सुरज पटाईत,श्रीमंत भोसले, सुभाष बेद्रे,बाबासाहेब भाऊ पटाईत आदी मंडळींनी परिश्रम घेतले बेद्रे परिवार व बाबासाहेब बबन घोरपडे यांनी फराळ व अन्नदान केले.कार्यक्रमास भाविक भक्तांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

भाजपा पंचायत राज व ग्रामविकास विभाग सोशल मीडिया

नगर जिल्हा संयोजकपदी संजय महाजन यांची नियुक्ती

राज्यभरातून होतोय कौतुकांचा वर्षाव..!

नगर /प्रतिनिधी
(सायं.दै.आरंभ)

शिर्डी येथील सामाजिक कार्यकर्ते, साईश्रद्धा प्रतिष्ठानचे संस्थापक व अध्यक्ष संजयजी महाजन साहेब यांची नियुक्ती करण्यात आली. अनेक वर्षापासून भारतीय जनता पार्टीचे विविध पदांवर काम करणाऱ्या आणि पक्षाचे ध्येय धोरणे जनतेपर्यंत आपल्या मीडियाच्या माध्यमातून आणि कामाच्या माध्यमातून पोहोच करणारे सर्व सामान्य जनतेची कळकळ असणारे, भाजपा पंचायत राज व ग्रामविकास विभागाच्या सोशल मीडियाच्या अहमदनगर जिल्हाध्यक्षपदी संजयजी महाजन यांची नियुक्ती करण्यात आली. भारतीय जनता पार्टी पंचायत राज्य व ग्रामविकास विभाग प्रदेश संयोजक गणेश काका जगताप यांनी निवड केली. असून याबाबतचे पत्र त्यांना अहमदनगरचे भाजपा खासदार सुजय दादा विखे पाटील आणि भाजपा पंचायत राज व ग्रामविकास विभाग उत्तर महाराष्ट्राचे (उपाध्यक्ष) सहसंयोजक बबनराव शेळके यांच्या हस्ते देण्यात आले.

यावेळी खासदार सुजय दादा विखे पाटील यांचे स्विय सहाय्यक किरण धावणे, संभाजी खडके, भाजपा पंचायत राज चे प्रदेश अध्यक्ष गणेश काका जगताप, प्रदेश उपाध्यक्ष वैशालीताई नागरे, महसूल मंत्री तथा पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील, खासदार सुजय दादा विखे पाटील, उत्तर नगर जिल्हाध्यक्ष विठ्ठलरावजी लंगे पाटील, अहमदनगर दक्षिण जिल्हाप्रमुख दिलीप भालसिंग, उत्तर विभाग अध्यक्ष रोहिदास धुमाळ पाटील, उत्तर विभाग उपाध्यक्ष बबनराव शेळके पाटील, डॉ.प्रशांत भदाणे, सामाजिक कार्यकर्ते गफ्फारखान पठाण यांनी पुढील वाटचालीस शुभेच्छा व अभिनंदन केले.

संदीप मानकर यांना ३० रोजी दिला जाणार राज्यस्तरीय महात्मा फुले समता गौरव पुरस्कार

सिल्लोड /विष्णू मुके शास्त्री
(सायं.दै.आरंभ)

सिल्लोड तालुक्यातील अनाड येथील सामाजिक कार्यकर्ते तथा उत्कृष्ट पत्रकार संदीप मानकर यांनी सामाजिक व पत्रकारिता क्षेत्रांत केलेल्या आदर्श व उल्लेखनीय कार्याबद्दल समता ग्रामीण विकास प्रतिष्ठान व आपले ज्ञानपंख वृत्तपत्र यांच्या वतीने दिला जाणारा राज्यस्तरीय महात्मा फुले समता गौरव पुरस्कार सिल्लोड शहरातील शेवंताबाई मंगल कार्यालयातील सभागृहात ज्येष्ठ साहित्यिक डॉ.ऋषिकेश कांबळे, सुप्रसिद्ध विचारवंत प्राचार्य नामदेवराव चाफे, झेपचे संपादक तथा समीक्षक डी.एन.जाधव आदींसहित प्रमुख मान्यवरांच्या हस्ते ता.३० नोव्हेंबर रोजी प्रदान करुन त्यांना सन्मानित केले जाणार आहे.

अत्यंत गरीब कुटुंबात जन्माला आलेले संदीप मानकर यांनी स्वकौशल्यातून पत्रकारिता क्षेत्रांत आपला वेगळा ठसा उमटवून असंख्य प्रश्नांना हात घालून आपल्या आदर्श पत्रकारितेतून न्याय दिलेला आहे. याचबरोबर राज्याचे माजी गृहराज्यमंत्री तथा संस्थापक अध्यक्ष रमेशदादा बागवे यांच्या मार्गदर्शनाखाली मातंग एकता आंदोलन या राज्यव्यापी सामाजिक संघटनेच्या माध्यमांतून अत्यंत सक्रियतेने काम करुन समाजाचे प्रश्न सोडविण्यासाठी असंख्य मोर्चे, आंदोलने व निवेदने देऊन सरकारचे लक्ष वेधले आहे व जनसामान्यांना न्याय दिलेला आहे. एखाद्या प्रश्नाला हात घातला म्हणजे तो पूर्णत्वास नेणे हा मानकर यांचा हातखंडा आहे. त्यांच्या याच उल्लेखनीय कार्याची आणि समाजाप्रती असलेल्या जिव्हाळ्याची दखल घेऊन समता ग्रामीण विकास प्रतिष्ठान व आपले ज्ञानपंख वृत्तपत्र यांच्या संयुक्त विद्यमाने दिला जाणारा राज्यस्तरीय महात्मा फुले समता गौरव पुरस्कार त्यांना ता.३० रोजी प्रदान केला जाणार असल्याची माहिती आयोजक दशरथ एन.सुरडकर, जयश्री सोनवणे, प्रवीण तायडे, संजय दांडगे, सुधाकर बनसोडे यांनी दिली आहे. त्यांना जाहीर झालेल्या या राज्यस्तरीय पुरस्काराबद्दल त्यांचे राजकीय, सामाजिक कला, क्रीडा आदी सर्वच स्तरांतून अभिनंदन केले जात आहे.

युवा काँग्रेस जिल्हा महासचिव युवकांना प्रबोधन करून साजरा केला वाढदिवस

भोकर/अनिल डोईफोडे
(दै. महाभारत)

येथील सामाजिक युवा कार्यकर्ते तथा काँग्रेस पक्षाचे युवा जिल्हा महासचिव यांनी आपला वाढदिवस अत्यंत साध्या पद्धतीने साजरा करण्याचे सर्व मित्र परिवारांना आवाहन केले वाढदिवसानिमित्त कुठलाच गाजावाजा न करता हार तुरे न अनता केवळ शब्दरूपी आशीर्वाद शुभेच्छा द्याव्यात कारण आमच्या प्रफुल नगर येथील दोन तरुण युवकांचे नुकतेच निधन झाल्यामुळे तो दुखवटा पाळण्यासाठी कोणीही माझ्या वाढदिवसानिमित्ताने हार तुरे न आणता केवळ शब्दरूपी आशीर्वाद देऊन शुभेच्छा देवात असे मित्रपरिवारांना सूचना देण्यात आल्या सामाजिक जाण व भान ठेवून समाजातील नवयुवकांचे निधन झाल्याकारणाने त्या मित्रांना माझ्या वाढदिवसाच्या निमित्ताने श्रद्धांजली अर्पण करतो असे विकास क्षीरसागर यांनी शुभेच्छा देण्यासाठी गेलो असताना पत्रकारांशी बोलताना त्यांनी प्रतिक्रिया दिली यावेळी पत्रकार अनिल डोईफोडे यांनी पुष्पहार घालून भावी नगरसेवक युवा कार्यकर्ते विकास क्षीरसागर यांना भरभरून शुभेच्छा रुपये आशीर्वाद दिला यावेळी पत्रकार दत्ताभाऊ ऑल इंडिया पँथर सेनेचे जिल्हा महासचिव निखिल हंकारे व पोलीस संघटनेचे तालुका अध्यक्ष चंद्रकांत मुस्तापुरे इत्यादी मित्रपरिवार उपस्थित होते.

माजलगाव येथे स्थूलत्व आणि मधुमेह मुक्तीसाठी डॉ. जगन्नाथ दीक्षित यांचे जाहीर व्याख्यान

माजलगाव : अमर साळवे
(सायं.दै.आरंभ)

येथील श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात स्थूलत्व आणि मधुमेह मुक्तीसाठी डॉ. जगन्नाथ दीक्षित यांचे जाहीर व्याख्यान आज रविवार दिनांक २६ नोव्हेंबर रोजी सकाळी साडेअकरा वाजता आयोजित करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून माजी आमदार मोहनरावजी सोळंके तसेच अध्यक्ष म्हणून डॉ. प्रकाशरावजी आनंदगावकर उपस्थित असणार आहेत. सिव्हिल सर्जन डॉ. सुरेशजी साबळे आणि वरिष्ठ फिजिशियन डॉ. जी. आर. देशपांडे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. आजच्या जगात स्थूलत्व आणि मधुमेह तसेच पुढील गुंतागुंतीचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. त्यावर प्रतिबंध आणि उपाय म्हणून आदर्श जीवनशैली आणि आहाराचे पालन करणे अत्यंत आवश्यक आहे. दिवंगत डॉ. श्रीकांत जिचकार यांच्या प्रेरणेने डॉ. जगन्नाथ व्ही. दीक्षित यांनी ह्यासाठी भारतभर तसेच विदेशातही फार मोठे अभियान चालविले आहे. त्याचाच एक भाग म्हणून माजलगावकरांना हा अनमोल लाभ होत आहे. तरी जनतेने ह्या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. सुहासजी मोराळे यांनी केले आहे. ह्याकामी माजलगाव डॉक्टर्स असोसिएशन,काही नामांकित संस्थांचे सहकार्य लाभले आहे.

मराठी चित्रपटसृष्टीत७०/८०चे दशक गाजवणाऱ्या चरित्र अभिनेते विलासराव रकटे यांची सर्वांकडूनच भयानक उपेक्षा, जीवन जगणे मुश्कील?

कल्याण/संजय कांबळे
(सायं.दै.आरंभ)

तांबड्या मातीचे मैदान मारल्यावर चित्रपटसृष्टीत पदार्पण करून आपल्या बलदंड शरीर, खर्जातील जबरदस्त पडदा व्यापणारा आवाज,करारी नजर आणि दमदार अभिनयाच्या जोरावर चित्रतपस्वी भालजी पेंढारकर, अनंत माने, दादा कोंडके, दत्ता माने, कमलाकर तोरणे व डॉ जब्बार पटेल अशा मातब्बर दिग्दर्शकांच्या ७०/८०मराठी आणि१०च्या आसपास हिंदी चित्रपटात काम करून चरित्र अभिनेते म्हणून कलारसिकांच्या आठवणीतल्या कप्प्यात कायमस्वरूपी घर करून राहिलेल्या प्रतिभासंपन्न विलासराव रकटे यांची उतारवयात मात्र गावासह सर्वांकडूनच भयानक उपेक्षा झाली आहे. यामुळे त्यांचे जगणे मुश्किल बनले आहे.कला, क्रीडा, सामाजिक, राजकीय क्षेत्रात मोलाचे योगदान देणा-या अशा गुणी अभिनेत्याला शासनाने वा-यावर सोडू नये अशी भावना त्यांच्या वर प्रेम करणाऱ्या चाहत्याकडून व्यक्त केली जात आहे.

विलास यशवंत रकटे यांचा जन्म३०जुलै१९४५रोजी कामेरी ता वाळवा जि सांगली येथे झाला. लहानपणीच वडीलांचा मृत्यू झाल्याने आई आक्काताई रकटे हिच्या वर कुंटूबाची जबाबदारी पडली, चुलते हैबती सखाराम पाटील यांनी यांनी शिक्षण व इतर जबाबदारी स्वीकारली, कामेरी येथे ७वीपर्यंत शिक्षण झाल्यावर पुढील शिक्षण इस्लामपूर व उच्च शिक्षण इंदूर युनिव्हर्सिटी मध्यप्रदेश झाले.बालपणापासून खेळाची आवड असल्याने कबड्डी, लांब उडी, गोळाफेक, भालाफेक, कुस्ती, यामध्ये अनेक बक्षिसे मिळवली, शाळा महाविद्यालयात अनेक नाटकामधून काम सुरू केले. त्यामुळे अभिनयाचे बाळकडू लहान वयातच मिळाले,

कुस्तीची पंढरी असलेल्या कोल्हापूर येथे गेल्यानंतर अनेक पैलवानांची ओळख झाली, बलदंड शरीरयष्टी यामुळे खाशाबा तालमितून कुस्ती चे धडे घेतले, डाव, प्रतिडाव यात तरबेज झाल्यावर विविध ठिकाणी नामांकित मल्लांबरोबर कुस्तीचे मैदाने गाजवली,मुंबई गोवा याही ठिकाणी कुस्तीचा डंका वाजत होता, हिंदकेसरी मारुती माने यांच्या सह मोठमोठ्या मुल्लांशी कुस्ती केली, मुख्यमंत्री, सह दारासिंग यांनी विलास रकटे यांचे कौतुक केलं. कुस्तीतील यशामुळे कामेरी ता वाळवा चे नाव संपूर्ण महाराष्ट्रात पोहचले होते. गावाच्या यात्रेत कुस्ती सह वाटचुकली, वाहतो दुर्वाची जुडी, कुंटुब, मी उभा आहे, वेगळं व्हायच मला,मुंबई ची माणसं अशी नाटकं केली,यातून खलनायक साकारले होते.

आई आहे शेतात, हा पहिला चित्रपट केल्यानंतर मात्र डॉ जब्बार पटेल यांच्या 'सामना, या चित्रपटाने रकटे यांच्या आयुष्याला कलाटणी मिळाली. हा चित्रपट मैलाचा दगड ठरला, यानंतर चित्रतपस्वी भालजी पेंढारकर, अनंत माने, दादा कोंडके, दत्ता माने,कमलाकर तोरणे अशा मातब्बर दिग्दर्शकांच्या चित्रपटात भूमिका साकारल्या,'पांडू हवालदार'चित्रपटापासून ते दांदाच्या चमूत दाखल झाले. बोटं लाविन तिथं गुदगुल्या, रामराम गंगाराम, तुमचं आमचं जमल, या चित्रपटात त्यांनी अभिनयाची चुणूक दाखवली, गनिमी कावा ,चित्रपटात थरारक तलवारबाजी करून अस्सल मोगल सुभेदार रंगवला,

त्या काळी चित्रपटांचा चेहरा पूर्णतः ग्रामीण असल्यामुळे रकटे यांच्या भूमिकाचा बाज देखील ग्रामीण ढंगाचा राहिला, फुकट चंबू बाबुराव, चोरावर मोर,गाव तस चांगल, पण वेशीला टांगल, निखारे, चांडाळ चौकडी,लक्ष्मी, सर्वसाक्षी, तांबव्याचा विष्णू बाळा, अंगारकी, सुळावरची पोळी, अश्या जवळपास ७०/८०मराठी चित्रपटात रकटे यांनी खलनायक साकारला,बहुतांश चित्रपटाचे चित्रीकरण आपल्या कामेरी गावातच केले. यामुळे गाव देश विदेशात पोहचले,१९७०/८०चे दशकात विलास रकटे हे रसिकांच्या गळ्यातील ताईत बनले होते,

आपले गाव दुष्काळाचे आहे, म्हणून रकटे यांनी कामेरी येडेनिपाणी पाणी योजना राबविण्याचा निर्णय घेतला, कृष्णा नदिचे पाणी इरिगेशन द्वारे आणन्यासाठी त्यांनी आपल्या ओळखीचा पुरेपूर वापर केला, तत्कालीन मुख्यमंत्री मनोहर जोशी,सुशीलकुमार शिंदे, राजारामबापू पाटील, वंसतदादा पाटील, यशवंतराव चव्हाण निळूभाऊ फुलं यांना गावात आणलं,२०/३०किलोमीटर पाईपलाईन करून ओसाड गाव सुजलाम सूफलाम केले, आज २०/२२हजार लोकसंख्या व १७सदस्य असलेले कामेरी गाव हिरवेगार दिसत आहे त्याचे शिल्पकार विलास रकटे हेच आहेत. यासह अनेक लोकोपयोगी व जनहितार्थ कामे करून त्यांनी

सामाजिक बांधिलकी जपली, ऐवढेच नाही तर 'गाव तसं चागलं पण वेशीला टांगल,या चित्रपटात गावातील वाद,राजकारण यामुळे गावाची कशी वाट लागते हे दाखवून दिलं तसं स्वतः देखील आचरण केले. गावात निवडणूका नको, बिनविरोध व्हायला हव्यात म्हणून त्यांनी २०ते३०वर्षे अंगाला गुलाल लावला नाही,

या योगदानाबद्दल विलास रकटे यांना व्ही शांताराम पुरस्कार, महात्मा फुले पुरस्कार, डॉ बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार, आचार्य अत्रे पुरस्कार, वंसतदादा पुरस्कार, कला रत्न पुरस्कार, उत्कृष्ट सांस्कृतिक कार्य पुरस्कार असे शेकडो पुरस्कार त्यांना मिळाले आहेत, अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळ, महाराष्ट्र शासन यांनी दिलेल्या पुरस्काराचा समावेश यामध्ये आहे.

करारी नजर, बलदंड शरीरयष्टी, खर्जातील पडदा व्यापणारा आवाज, आणि आवेशपूर्ण अभिनयाच्या जोरदार रकटे यांनी संत्तर ऐंशीचे दशक गाजवलं, मराठी चित्रपटसृष्टी मर्यादित असताना चित्रपटाचे बजेट मर्यादित, वितरणात अनंत अडचणी, सर्वदूर पसरलेल्या प्रेक्षकापर्यंत चित्रटप पोहचवणे अशी आव्हाने असताना ग्रामीण भागातील रांगडा कलाकार विलास रकटे चित्रपटसृष्टीत भक्कम उभा राहिला. खलनायक, चरित्र अभिनेता अशी इमेज असली तरी नायक म्हणून त्यांनी अन्याय व प्रतिकार या दोन चित्रपटात भूमिका केल्या, या चित्रपटाची निर्मिती व दिग्दर्शक रकटे यांनी च केले होते. यासाठी त्यांनी५लक्ष रुपये घेतले होते.१९९०मध्ये प्रदर्शित झालेल्या प्रतिकारक ला प्रेक्षकांचा उत्तम प्रतिसाद लाभला.आ चित्रपटात डॉ श्रीराम लागू, शरद तळवलकर, निळू फुले, अलका कुबल, असे दिग्गज कलाकार यामध्ये होते, उन्मत पुढा-याना धडा शिकवणारा रणजीत लक्षवेधी ठरला,पुढे१०वर्षानी 'प्रतिडाव,ची निर्मिती केली पुन्हा आघाडीच्या कलाकाराची फळी दिसली, पण या चित्रपटाचे म्हणावे तेवढे कौतुक झाले नाही, याचा परिणाम असा झाला की, कर्जाचा डोंगर उभा राहिला,५लाखाचे ३०लक्ष द्यावे लागले, शिवाय मुंबई चा बंगला विकला, गावाची शेती गेली, उपासमारीची वेळ आली,

सध्या विलास रकटे यांचे ८०ते८५वय आहे, दोन्ही गुडघ्यावर शस्त्रक्रिया झाली आहे, औषधोपचार सुरू आहे, वैद्यकीय खर्च परवडत नाही, शासनाच्या२/३हजार रुपये मिळणाऱ्या तुटपुंज्या मानधनावर कसातरी घरखर्च चालतो आहे, पत्नी अरुणा यांना ही मणक्यांचा आजार आहे, एकूणच जीवन जगणे मुश्कील बनले आहे. रकटे कुंटूबीय हे स्वातंत्र्य आंदोलनात व चलेजाव चळवळीत सक्रिय सहभागी झाल्याने सांगली, सातारा जिल्ह्यातील स्वातंत्र्य आंदोलनातील क्रातीसिंह नाना पाटील, नागनाथअण्णा नायकवडी, राजाराम बापू पाटील, यशवंतराव चव्हाण, वंसतदादा पाटील, पांडू मास्तर, आदीचे स्वातंत्र्य चळवळीतील योगदान सांगणारा 'क्रांतीपर्व, या चित्रपटाची कथा, पटकथा, संवाद, लेखन पुर्ण झाले आहे. पण केवळ आर्थिक अडचणी मुळे हे साहित्य धुळखात पडले आहे. नव्या पिढीला क्रांतिकारकाचे योगदान कळावे, समजावे, हा उद्देश या मागचा आहे, पण तो सध्या साध्य होईल असे वाटत नाही.

सध्याचा मराठी चित्रपट सातासमुद्रापार पोहचला आहे ढिगभर चँनेल आणि मल्टिप्लेक्स मध्ये मराठी चित्रपट वाजत गाजत आहे. या काळात शेकडो कलाकार आले अन् विस्मरणात गेले. मात्र आपल्या जरबयुक्त आवाजाने पडादा व्यापणारा,करारी नजर, बलदंड शरीर आवेशपूर्ण अभिनयामुळे विलास रकटे नावाचा प्रतिभासंपन्न अष्टपैलू कलाकार आठवणींच्या कप्यात राहिला. खरे सांगायचे तर अभिनेते विलास रकटे यांचे चित्रपट, कला क्रीडा, सामाजिक, राजकीय क्षेत्रातील अमुल्य योगदान, कामेरी गावाला देशाच्या कानाकोपऱ्यात पोहचविण्याचे केलेले काम, जपलेली सामाजिक बांधिलकी, याचा विचार केला तर या परिसरात उदयास आलेली कारखादारी, वाढलेले विविध उद्योग, राजकीय पुढारी, नेते, शासन,चित्रपट निर्मिती संस्था, पतपुरवठा संस्था, आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे गाव या सर्वांना ठरविले, निश्चय केला तर या अष्टपैलू, प्रतिभासंपन्न चरित्र अभिनेत्याच्या आयुष्यात 'आर्थिक, ओलावा निर्माण करु शकत नाही का?क्रांतीपर्व, हा चित्रपट तयार होऊन प्रदर्शित व्हावा हि एकच आशा रकटे यांची आहे, ती पुर्ण होईल का?स्वतः ची पाठ थोपटून घेण्यासाठी शासन लाखो रुपये जाहिरातबाजीवर खर्च करत आहे,ते हा आपला अमुल्य ठेवा जपून ठेवण्यासाठी पुढाकार घेईल का? अन्यथा, जुनं ते सोनं,ही म्हण नामशेष होईल, ऐवढे नक्की!

आम्ही भारताचे लोक.....

भारतीय संविधानाच्या निर्मितीपासून ते लागू होईपर्यंत आणि लागू झाल्यानंतर देखील आजपर्यंत भारतीय संविधानाबद्दलची नकारात्मक भूमिका वारंवार पुढे आलेली आहे. असे असले तरी भारतीय संविधान हे जगातील एक श्रेष्ठ संविधान असल्याकारणाने ते टिकून आहे आणि ते टिकूनच राहणार. भारतीय संविधानाला दस्तरखूद केंद्र सरकारच्याच वतीने हादरे देण्यात आले आहेत. उदाहरणार्थ- तत्कालीन प्रधानमंत्री अटल बिहारी वाजपेयी यांनी संविधान समिक्षा/ पुनर्विलोकन समिती तयार करून काही नवे करता येते का हा प्रयत्न केला तथापि त्यातून काहीच निष्पन्न झाले नाही.मात्र संविधानाबद्दलची जागृतता निर्माण होण्यासाठी ही एक घटना घडली आहे. संविधान जागृती होण्यासाठीआणखी काही घटना या देशात घडल्या- उदाहरणात ३७० वे कलम रद्द करणे, संविधानापेक्षा गीता श्रेष्ठ आहे अशी पुंगाणी वाजवणे, संविधानाच्या उद्देशपत्रिकेतील काही राष्ट्रीय मूल्ये आणि ध्येयधोरणावरच आक्षेप घेतले जाणे, दिल्लीच्या जंतर-मंतरवर संविधान जाळणे, संविधानातील काही तरतुदींबाबत नकारात्मक भूमिका मांडणे. काही कलमावरही आक्षेप घेणे अशा घटना घडल्या असल्या तरीही भारतीय संविधान हे आजवर चिरंतन राहिले आहे आणि ते पुढील कित्येक वर्ष बाधित राहील एवढी ताकद आपल्या भारतीय संविधानामध्ये आहे.

भारतीय संविधानाबद्दल भारतीय लोकांमध्ये तेवढे जागृती नाही हे तेवढेच सत्य आहे! वास्तविक पाहता देशाचा कारभार ज्या लिखित संहित्येनुसार चालतो ती संहिता लोकांना ज्ञात असणे, संविधान साक्षरता असणे हे आवश्यक आहे.परंतु ही जागृती का निर्माण झाली नाही?एक तर या देशातील राज्यकर्त्यांना लोकांमध्ये संविधानाबद्दल जागृती निर्माण व्हावी असे कधीच वाटले नाही. त्यांना ती गरज भासली नाही.लोकांना अज्ञानी ठेवणे हा ही कदाचित त्यांचा उद्देश असू शकेल! दुसरे म्हणजे आपल्या देशातील बुद्धिमान लोकांनी सुद्धा (याला काही सन्माननीय अपवाद आहेत) संविधान जागृती व्हावी यासाठी ठोस कार्यक्रमाची गरज प्रतिपादन केली नाही त्यामुळे संविधानाबद्दल जागृती निर्माण होऊ शकली नाही. या देशातील ८० टक्के लोकांना संविधानाबद्दल माहिती नसणे हा देशासाठी धोका आहे. याची जाणीव ठेवून येत्या *संविधान अमृत महोत्सवी वर्षात तरी ठोस कार्यक्रम हे सरकारने दिले पाहिजेत. लोकांमध्ये संविधान साक्षरता निर्माण केली पाहिजे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांच्या संविधान सभेने आपले संविधान अत्यंत परिश्रमाने अभ्यासाने आणि अत्यंत दूरदृष्टीने तयार केले आहे २ वर्ष ११ महिने आणि १७ दिवस अशा प्रदीर्घ काळात हे संविधान तयार झाले. स्वातंत्र्यानंतर म्हणजे २६ नोव्हेंबर १९४९ या दिवशी हे संविधान राष्ट्रपतींनी संविधान सभे कडून ते स्वीकारले. अंगीकृत केले म्हणून हा दिवस संविधान दिन म्हणून साजरा केला जातो. संविधान अर्पण दिन, संविधान गौरव दिन अशा शीर्षकाखाली हा दिवस साजरा केला जातो. मुळात ३९५ कलमी असणारे २२ विभागात विभागलेले आणि बारा परिशिष्टे शेवटी जोडलेले हे प्रदीर्घ संविधान आहे. या लिखित संविधानानुसार देशाचे पंतप्रधान ,राष्ट्रपती संसद,मंत्रिमंडळ, न्यायव्यवस्था काम करते. भारतीय संविधानाचे अनेक वैशिष्ट्ये ही लोकांना माहीत असण्याची गरज आहे.हे संविधान लिखित आणि प्रदीर्घ आहे. संविधानात कायदा आणि निर्माण करण्यासंबंधी तर तुम्ही आहे. कायदेमंडळ कार्यकारी मंडळ आणि न्यायमंडळ यांना समान दर्जा दिला असून कोणीच श्रेष्ठ व कोणीच कनिष्ठ नाही. न्याय मंडळाचे अस्तित्व अबाधित ठेवले आहे प्रत्येक घटक राज्यांसाठी मार्गदर्शक तत्वे घालून देण्यात आलेली आहेत स्थानिक स्वराज्य संस्था मधून सामान्यातल्या सामान्य माणसाला सत्ता प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी संविधान देते. एक माणूस एक मत आणि एक मूल्य या सूत्रानुसार देशातील सर्व नागरिकांना समान स्थान आहे कोणीच नाही परंपरेने चालत आलेली जातीव्यवस्था ही कायद्याने नष्ट करण्यात आली आहे. तसेच परंपरेने दबला गेलेला आणि सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक दृष्ट्या वंचित झालेल्या समूहाचा उद्धार करण्याचे ध्येय संविधानात आल्याकारणाने संविधान हा या देशातील सामान्य माणसाचा श्वास आहे.

आपले संविधान हे कोण्या ईश्वराला अगर कोणत्या अज्ञात शक्तीला प्रदान केलेले नाही तर हे संविधान भारतीयांना प्रदान केलेले आहे,हे याचे आणखी एक वैशिष्ट्य आहे. भारतीय संविधान एकदमच कलम अर्थात अनुच्छेदाने सुरू झालेले नाही तर या संविधानाला सुयोग्य प्रस्तावना जोडलेली आहे हे भारतीय संविधानाचे सगळ्यात मोठे जागतिक वैशिष्ट्य आहे. या प्रस्तावनेला सरनामा,प्रस्ताविका किंवा उद्देश पत्रिका असे ही म्हणतात. ही उद्देश पत्रिका इतकी आशयगर्भ आहे की संपूर्ण राज्यघटनेचा सारांश या प्रस्ताविकेत आलेला आहे.आमची राष्ट्रीय मूल्ये, राष्ट्रीय ध्येय आणि विकासाचा मार्ग असा त्रिवेणी संगम या प्रास्ताविकेत आहे. सर्वोच्च न्यायालयाचे एक सुप्रसिद्ध न्यायाधीश असे म्हणतात की एखादी गुंतागुंतीचे बाब ही कोणत्याच कलमांमध्ये किंवा जोडलेल्या मार्गदर्शक तत्वामध्ये सापडली नाही तर ती संविधानाच्या प्रास्ताविकेत सापडते.

बरेच लोक भारतीय संविधान आणि भारतीय दंड संहिता यामध्ये गफलत करतात. भारतीय दंड संहिता ही गुन्हेगारीच्या बाबतीतले कायदे, तरतुदी, शिक्षा स्पष्ट करते आणि भारतीय संविधान यासाठी मार्गदर्शक तत्त्वे ठरवून देते. राज्यकारभार, व्यापार कंपनी कारभार, चलन व्यवहार, राज्यकारभार, परराष्ट्र व्यवहार यासंबंधी स्पष्ट कलमनिहाय बाबी भारतीय संविधान घालून देते. संविधानाच्या आणखी एक वैशिष्ट्य असे आहे की या संविधानाने नागरिकांसाठी काही मूलभूतकर्तव्ये घालून दिलेली असून काही मूलभूत हक्क नागरिकांना प्रदान करण्यात आलेले आहेत. ते अनिवार्य करण्यात आले आहेत. भारतीय संविधान नागरिकांना अगोदर हक्क देते आणि नंतर कर्तव्य सांगते यावरून या संविधानाची सर्वंकष व्यापकता आणि उदार हेतू स्पष्ट होतो. कलमातील अन्य गुंतागुंत सोडा परंतु भारतीय संविधान कोणते मूलभूत अधिकार आम्हाला देते आणि कोणते कर्तव्य घालून देते याची जाणीव नागरिकांना होणे आवश्यक आहे.आता हा लेख वाचून अनेकांना संविधान आणि दिलेले हक्क आणि कर्तव्य याची जिज्ञासा निर्माण होईल हे निश्चित!

वाचकांसाठी बरीच कलमे देता येतील. परंतु काही ठराविक कलमे या ठिकाणी निर्दिष्ट करण्याचा मोह होतो-

कलम क्रमांक १४- कायद्यापुढे सर्व नागरिक समान असतील. कलम क्रमांक १५_कोणत्याच कारणावरून भेदभाव केला जाणार नाही.कलम क्रमांक-१६ सार्वजनिक सेवा योजनेच्या बाबतीत सर्वांना समान संधी मिळेल, कलम क्रमांक १७ नुसार अस्पृश्यता कायद्याने नष्ट होईल. कलम क्रमांक १८-यापूर्वीचे किताब/ सार्वजनिक पदव्या नष्ट होतील. कलम क्रमांक १९- प्रत्येकाला स्वातंत्र्याचा अधिकार राहील. कलम क्रमांक २३- प्रत्येकाला शोषणाविरुद्ध चा हक्क असेल. क्रमांक २५- प्रत्येकाला धार्मिक स्वातंत्र्य असेल कलम क्रमांक- २९ देशातील अल्पसंख्यांकांचे हिताचे संरक्षण केले जाईल. भारतीय साधनांमध्ये कलम क्रमांक ३२ ते ३५ ही कलमे फार महत्त्वाची आहेत.भारतीय संविधान

नागरिकांना जे हक्क प्रदान करते ते हक्क संविधानिक असून ते कुणी हिरावून घेत असतील तर संविधानिक उपाययोजनांचा अधिकार नागरिकांना प्रदान करण्यात आलेले आहे.

भारतीय संविधानाच्या भाग चार मध्ये राज्यधोरणांची निदेशक तत्त्वे नमूद करण्यात येऊन राज्यातील लोकांच्या साठी राज्य सरकारने कोणत्या उपाययोजना केल्या पाहिजेत. कलम क्रमांक ३६ ते ५१ पर्यंत या तरतुदी आहेत. कलम क्रमांक- ४५ नुसार या देशातील प्रत्येक बालकांना प्राथमिक शिक्षण हे सार्वत्रिक आणि मोफत करण्यात आलेले आहे. हा नागरिकांचा अधिकार झालेला असून तो आर टी इ या सुधारित कायद्यानुसार अधिक व्यापक बनवण्यात आलेला आहे. आणखी काही कलमे या ठिकाणी नमूद केली तर हा लेख फार क्लिष्ट होईल म्हणून वाचकांचे जिज्ञासा म्हणून एवढेच नमूद करतो की भारतीय संविधान हे प्रत्येकाने वाचावे तरतुदी माहीत करून घ्याव्यात. संविधानाचे प्रास्ताविका ही उपयुक्त आणि अनुकरणीय असल्याकारणाने देशातील अर्ध्याधिक प्रश्न यामुळे सुटतील. भारतीय संविधान हे एकदम कॉंक्रिट नाही . भारतीय संविधानाच्या तरतुदीमध्ये काळाच्या ओघात काही सुधारणा बदल करायचा असेल तर ती स्वातंत्र्य घटनाकारांनी संसदेला दिलेले आहे. कलम क्रमांक- ३६८ मध्ये हे तरतूद आलेली आहे वाचकांनी ती जरूर वाचावी. भारतीय संविधानाने या देशातील अनुसूचित जाती आणि जमातींचे तसेच ओबीसींचे अल्पसंख्यांकांचे आरक्षण हा अधिकार बनवलेला आहे. कलम क्रमांक३३८,३३९, ३४०, ३४१ आणि३४२चे अध्ययन करावे. नवीन वंचित समूहांना आरक्षण देण्याची तरतूद संविधानाने केलेलीआहे. त्यासाठी कलम क्रमांक -१५ आणि त्यातील सुधारणा तसेच कलम क्रमांक -१६ आणि त्यातील सुधारणा या विस्तृतपणे वाचाव्यात. अन्यत्र देखील यासंबंधी चे निर्देश आलेले आहेत.

भारतीय संविधानाच्या निर्मितीपासून ते लागू होईपर्यंत आणि लागू झाल्यानंतर देखील आजपर्यंत भारतीय संविधानाबद्दलची नकारात्मक भूमिका वारंवार पुढे आलेली आहे. असे असले तरी भारतीय संविधान हे जगातील एक श्रेष्ठ संविधान असल्याकारणाने ते टिकून आहे आणि ते टिकूनच राहणार. भारतीय संविधानाला दस्तरखूद केंद्र सरकारच्याच वतीने हादरे देण्यात आले आहेत. उदाहरणार्थ- तत्कालीन प्रधानमंत्री अटल बिहारी वाजपेयी यांनी संविधान समिक्षा/ पुनर्विलोकन समिती तयार करून काही नवे करता येते का हा प्रयत्न केला तथापि त्यातून काहीच निष्पन्न झाले नाही.मात्र संविधानाबद्दलची जागृतता निर्माण होण्यासाठी ही एक घटना घडली आहे. संविधान जागृती होण्यासाठीआणखी काही घटना या देशात घडल्या- उदाहरणात ३७० वे कलम रद्द करणे, संविधानापेक्षा गीता श्रेष्ठ आहे अशी पुंगाणी वाजवणे, संविधानाच्या उद्देशपत्रिकेतील काही राष्ट्रीय मूल्ये आणि ध्येयधोरणावरच आक्षेप घेतले जाणे, दिल्लीच्या जंतर-मंतरवर संविधान जाळणे, संविधानातील काही तरतुदींबाबत नकारात्मक भूमिका मांडणे. काही कलमावरही आक्षेप घेणे अशा घटना घडल्या असल्या तरीही भारतीय संविधान हे आजवर चिरंतन राहिले आहे आणि ते पुढील कित्येक वर्ष बाधित राहील एवढी ताकद आपल्या भारतीय संविधानामध्ये आहे.

थोडक्यात भारतीय संविधान या देशातील नागरिकांच्या हक्कांची महासनद आहे. भारतीय संविधानाशी निष्ठा आणि अनुपालन महत्त्वाचा असून आजच्या संविधान दिनी याचे भान असावे यासाठी हा लेख प्रपंच आहे. धन्यवाद

-प्रा लक्ष्मण गुंजाळ,
राज्यसदस्य, सत्यशोधक ओबीसी परिषद,
महाराष्ट्र
मो. ९६ ६५ ८१ ५१ ३८

उरण नगरपालिका क्षेत्रात स्वच्छता अभियानाअंतर्गत साफसफाई

उरण/विठ्ठल ममताबादे
(सायं.दै.आरंभ)

मागील महिन्या प्रमाणे दिनांक २४/११/२०२३ रोजी उरण शहरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले.सदर अभियानात उरण शहरातील तहसील कार्यालय परिसर ते मशीद मोहल्ला ते महात्मा गांधी पुतळा ते हरीपांडवपथ पर्यंत परिसरात स्वछता अभियान घेण्यात आले . सदर अभियानात एकूण ३ टन कचरा उचलण्यात आला. या अभियानात उरण नगर परिषदेचे मुख्याधिकारी राहुल इंगळे, लेखापाल सुरेश पोसतांडेल, बांधकाम अभियंता झुंबर माने , आरोग्य निरीक्षक हरेश तेजी , प्रशासकीय अधिकारी अनिल जगधानी, कर निरीक्षक संजय डापसे, तसेच उरण नगर परिषदेचे सफाई कर्मचारी / मुकादम यांचे श्रमदानातून स्वछता अभियान पार पडले. तसेच उरण नगर परिषद शाळा क्र १,२,३ चे शिक्षक तसेच विद्यार्थी यांनी सदर अभियानात भाग घेऊन श्रमदान केले. या अभियानामुळे उरण नगर परिषद हद्दीतील परिसर स्वच्छ व सुंदर झाले.शहर स्वच्छ व सुंदर झाल्याने नागरिकांनी आनंद व्यक्त केला. या अभियानाचे कौतुक करत नागरिकांनी नगर परिषदेचे आभार मानले.

मनमाड, लासलगाव व निफाड परिसरातील प्रवाशांसाठी

नवीन हक्काची मेमू चालू करावी

मा जि प सदस्य डी के नाना जगताप

रामभाऊ आवारे ।निफाड
(सायं.दै.आरंभ)

निफाड परिसरातील तसेच मनमाड व लासलगाव येथील रेल्वे प्रवाशांसाठी मुंबईकडे जाण्यासाठी नोकरदार तसेच प्रवाशांसाठी कोणतीही रेल्वे गाडी उपलब्ध नसल्याने त्यांना नासिक व मुंबईकडे जाण्यासाठी रेल्वे गाडी सुरू करणे गरजेचे असल्याने ही नवीन हक्काची मेमू गाडी लवकरात लवकर सुरू करावी अशी मागणी लासलगाव गटाचे माजी जिल्हा परिषद सदस्य यांनी रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांच्याकडे केली आहे. मनमाड,लासलगाव व निफाड परिसरातील अनेक नोकरदार वर्ग, व्यापारी, विद्यार्थी, महिला प्रवासी यांना नाशिक व इगतपुरी जाण्यासाठी सकाळी कोणतीही रेल्वे उपलब्ध नसते ज्या गाड्या उपलब्ध आहेत त्या सर्व लांब पल्ल्याच्या असल्यामुळे महिला प्रवासी व विद्यार्थ्यांची गर्दीमुळे तारांबळ होते तसेच या गाड्या नेहमी उशिराने येत असल्याने नोकरदार वर्ग व विद्यार्थी वेळेवर आपल्या इच्छित ठिकाणी पोहोचू शकत नाही त्यामुळे प्रवाशांची होणारी गैरसोय लक्षात घेता परिसरातील प्रवाशांसाठी हक्काची मेमू चालू करावी तसेच कोरोनाकाळात बंद केलेल्या जनता व देवगिरी एक्सप्रेस चे थांबे पूर्वरत करावेत अशी मागणी मा. जिल्हा परिषद सदस्य तथा स्थायी समिती सदस्य डी के नाना जगताप यांनी केली.

कोटमगाव व तळेगाव रोही या परिसरात असणाऱ्या रेल्वे लेव्हल क्रॉसिंग नंबर १०४ व १११ येथे रेल्वे अंडर ब्रिज चे काम लवकरात लवकर सुरू करावे जेणेकरून परिसरात राहणाऱ्या शेतकऱ्यांना आपल्या शेतमालाची ने आण करणे सोपे होईल.डि के नाना जगताप यावेळी म्हणाले की, यापूर्वीही या परिसरातील

शेतकऱ्यांची व विद्यार्थ्यांचे अडचण लक्षात घेता भुसावळ येथील डी आर एम श्रीमती इति पांडे व कुटुंब व आरोग्य कल्याण मंत्री भारतीताई पवार यांनाही निवेदन देण्यात आले होते व परिसरातील काम लवकरात लवकर चालू करण्याचे त्यांनी आश्वासन दिले होते तरी हे काम तात्काळ मार्गे लावण्यासाठी शासकीय स्तरावर प्रयत्न करण्याची त्यांनी विनंती केली.वरील सर्व कामे लवकरात लवकर मार्गी लावावीत यासाठी रेल्वे राज्यमंत्री माननीय श्री रावसाहेब दानवे यांना निवेदन देण्यात आले.यावेळी मा.जिल्हा परिषद सदस्य तथा स्थायी समिती सदस्य श्री डी के नाना जगताप, भाजपा नाशिक दक्षिण जिल्हाध्यक्ष श्री सुनील बच्छाव व भाजपाचे इतर पदाधिकारी उपस्थित होते.

माजलगावात टिपू सुलतान जयंती निमित्त रुग्णांना फळाचे वाटप

माजलगाव : अमर साळवे
(सायं.दै.आरंभ)

आझाद समाज पार्टी व भीम आर्मी यांच्या संयुक्त विद्यमाने माजलगावात दिनांक २० नोव्हेंबर २०२३ रोजी टिपू सुलतान यांची जयंती साजरी करून माजलगाव येथील ग्रामीण रुग्णालयात रुग्णांना फळ वाटप करण्यात आले.यावेळी आझाद समाज पार्टीचे तालुकाध्यक्ष उस्मान शेख , मानवी हक्क अभियान चे जिल्हाध्यक्ष राजेश घोडे, नवीद सिद्दिकी शेख गुलाब रहीमभाई, अरेफ भाई यांच्या सह कार्येकर्ते उपस्थित होते.

दिवा भाजपच्या ज्योती पाटील व मनसे च्या मयुरी तेजस पोरजी यांचा ठाकरेंच्या शिवसेनेत प्रवेश

अमित जाधव /प्रतिनिधि
(सायं.दै.आरंभ)

दिवा:-तन्वी फाउंडेशनच्या माध्यमातून दिवा शहरातील महिलांच्या प्रश्नांवर कायम आक्रमकपणे आवाज उठवणाऱ्या तसेच दिवा भाजपच्या महिला अध्यक्षा म्हणून मागील एक वर्षापासून सक्रिय काम करणाऱ्या ज्योती पाटील यांना पक्षाने पदावरून डावल्यानंतर त्यांनी अखेर ठाकरेंच्या शिवसेनेची मशाल हाती घेतली. तर उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वाला प्रभावित होऊन मयुरी पोरजी व तेजस पोरजी यांनी आज पक्ष प्रवेश केला

शनिवारी दुपारी ज्योती पाटील यांनी शेकडो कार्यकर्त्यांसह ठाकरेंच्या शिवसेनेत प्रवेश केला. शिवसेनेचे नेते राजन विचारे, लोकसभा संपर्कप्रमुख गुरुनाथ खोत, ठाणे जिल्हा प्रमुख केदार दिघे, कल्याण जिल्हाप्रमुख सदानंद थरवळ यांच्या नेतृत्वाखाली शेकडो महिलांच्या उपस्थितीत ज्योती पाटील व मयुरी पोरजी तेजस पोरजी यांनी ठाकरेंच्या शिवसेनेची मशाल हाती घेतली.यावेळी शिवसेना

उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे दिवा शहर पदाधिकारी सचिन पाटील शहर प्रमुख रोहिदास मुंडे शहर संघटक,अभिषेक ठाकूर युवा शहर अधिकारी वैष्णव पाटील उपशहर प्रमुख,योगिता नाईक उपशहर संघटिक,प्रियंका सावंत उप शहर संघटिका,गुरुनाथ नाईक विभाग प्रमुख,नवनीत पाटील समाजसेवक चेतन पाटील विभाग प्रमुख,मच्छिंद्रनाथ लाड विभाग प्रमुख,हेमंत नाईक समाजसेवक,स्मिता जाधव विभाग संघटीका,दिवा शहरातील इतर सर्व शिवसेना युवासेना पदाधिकारी युवा उपशहर प्रमुख उपविभाग प्रमुख शाखाप्रमुख उपशाखाप्रमुख गटप्रमुख व तमाम शिवसैनिक उपस्थित होते.ज्योती पाटील व मयुरी पोरजी यांनी ठाकरेंच्या शिवसेनेत प्रवेश केल्याने पक्षाला अधिक बळकटी मिळेल अशी अपेक्षा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे कार्यकर्ते व्यक्त करत आहेत.

अगोदर मराठा आरक्षणाचा प्रश्न सोडवा नंतरच परळीत शासन आपल्या दारी कार्यक्रम घ्या- मराठी क्रांती मोर्चा

परळी / विकास वाघमारे
(सायं.दै.आरंभ)

राज्य सरकारने अगोदर मनोज जरांगे यांना दिलेल्या शब्दाप्रमाणे मराठा आरक्षणाचा प्रश्न सोडवावा नंतरच परळीत शासन आपल्या दारी कार्यक्रम घ्यावा अन्यथा कार्यक्रमात मुलें, बाळं,जनावरांसह घुसून निषेध करू असा इशारा मराठा क्रांती मोर्चा परळीच्या वतीने उपविभागीय अधिकारी यांच्या मार्फत मुख्यमंत्र्यांना देण्यात आला आहे.

परळीत येत्या ३ डिसेंबर रोजी तहसील कार्यालयासमोरील भव्य मैदानावर शासन आपल्या दारी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.याबाबत जोरदार तयारी सुरू आहे.परंतू आज मराठा क्रांती मोर्चा परळीच्या वतीने उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन देऊन या कार्यक्रमास विरोध करण्यात आला आहे.निवेदनात म्हटले आहे की,प्रथम बीड जिल्ह्यात निष्पाप मराठा मुलांची धरपकड करण्यात येत आहे.त्यांच्यावर गंभीर गुन्हे दाखल करण्यात येत आहेत.

विद्यार्थ्यांचे शैक्षणिक व परीक्षा शुल्क माफी व ऊसतोड कामगारांच्या पाल्यांचे हंगामी वस्तीगृहे तात्काळ सुरू करण्याचे एसएफआयची मागणी



मागण्या मान्य न झाल्यास जिल्ह्यासह राज्यात करणार तीव्र आंदोलन

वडवणी (प्रतिनिधी)

महाराष्ट्रसह मराठवाड्यात यावर्षी अत्यंत कमी पाऊस झाल्यामुळे दुष्काळाचे मोठे सावट निर्माण झाले आहे. तस पाहिलं तर मराठवाडा हा कायमस्वरूपी दुष्काळाने होरपळलेला भाग असून मराठवाड्याची अर्थव्यवस्था पूर्णतः पाऊस व शेती वर अवलंबून आहे. यावर्षी पाऊस न झाल्याने मराठवाड्यातील अर्थव्यवस्थेवर मोठा परिणाम झाला आहे. शेतकरी, कामगार, कष्टकरी, सर्वसामान्य नागरिक मोठ्या प्रमाणात आर्थिक संकटात असल्या कारणाने त्यांच्या मुला-मुलींच्या शिक्षणाचा खर्च त्यांना झेपत नसल्याने अनेक विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहत आहेत. ही अत्यंत गंभीर बाब असून याच अनुषंगाने दुष्काळजण्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ अंतर्गत येणाऱ्या सर्व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे संपूर्ण शैक्षणिक शुल्क व परीक्षा शुल्क माफ करण्यात यावे ही मागणी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री यांच्याकडे बीड जिल्हाधिकारी यांच्या मार्फत पाठवण्यात आलेल्या निवेदनाद्वारे स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया बीड जिल्हा कमिटीच्या वतीने करण्यात आलेली आहे.

बीड जिल्हा हा ऊसतोड कामगारांचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. जिल्ह्यात रोजगार उपलब्ध होत नसल्यामुळे प्रतिवर्षी लाखो कुटुंब पोटाची खळगी भरण्यासाठी बाहेर जिल्ह्यात व पर राज्यात ऊसतोडणी करण्यासाठी जातात अशावेळी या ऊसतोड कामगार कुटुंबातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा प्रश्न निर्माण होतो. अशा विद्यार्थ्यांसाठी हंगामी वस्तीगृह सुरू करण्यासाठी एसएफआय ने दरवर्षी नेहमी पुढाकार घेतला असून वेळोवेळी प्रशासनास अशी वस्तीगृहे सुरू करण्यास भाग पाडले आहे. यंदा मात्र अद्यापही ही वस्तीगृहे सुरू झाले नसून हे वस्तीगृहे तात्काळ सुरू करण्यात यावे या मागणीचे निवेदन बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना एसएफआयच्या वतीने देण्यात आले आहे. शाळा सुरू होण्याच्या सुरुवातीला हे वसतिगृहे सुरू झाले नाही तर जिल्हा परिषदेवर विद्यार्थ्यांना घेऊन मोठा मोर्चा काढण्यात येणार आहे.

यावेळी एसएफआयचे जिल्हाध्यक्ष लहू खारगे, बीड तालुकाध्यक्ष शिवा चव्हाण, तालुका उपाध्यक्ष अक्षय वाघमारे, जिल्हा कमिटी सदस्य अभिषेक आडागळे, डीवायएफआय युवक संघटनेचे तालुका अध्यक्ष सुहास जायभाय, एसएफआयचे उत्तरेश्वर मस्के, अभिषेक गुंदेकर, कृष्णा जगताप आदी विद्यार्थी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

सहकार (आर्थिक) चळवळ प्रगतीपथावर ठेवण्यासाठी संस्थाचालक व त्यांच्या सर्व संचालकांनी जागृत राहणे आवश्यक - राजकिशोर मोदी

संस्थाचालक व संचालकांनी संस्थेकडे मालक म्हणून न पाहता विश्वस्त म्हणून काम करावे

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

सध्या राज्यात सतत कुठली न कुठली बैंक, पतसंस्था तथा मल्टिस्टेट बुडित निघाल्याच्या बातम्या वारंवार समोर येत आहेत. अशा संस्थांच्या विविध शाखांमध्ये ग्राहकांनी पोटाला चिमटा काढून आपल्या उज्वल भवितव्यासाठी अतिशय विश्वासाने आपली जमापुंजी ठेवीच्या रूपाने ठेवलेली असते. या ठेवीचे रक्षण करणे हे त्या संस्थेच्या सर्व संचालकांची जवाबदारी असते. ग्राहकांच्या विश्वासाला तडा जावु न देण्याचे काम संस्था चालकाचे असते. मात्र सध्या दिवसेदिवस कोणती न कोणती संस्था डबघाईला येऊन बुडीत निघालेली आढळून येत आहे त्यामुळे राज्यातील आर्थिक सहकार चळवळी वरील नागरिकांचा विश्वास कमी होताना दिसून येत आहे. तेव्हा आर्थिक सहकार चळवळ गतिमान व प्रगती पथावर ठेवणासाठी संस्थाचालक व त्यांच्या सर्व संचालकांनी सतत जागृत रहावे. तसेच संस्थाचालक व संचालकांनी मालक म्हणून काम न करता आपण संस्थेचे विश्वस्त आहोत अशीच भूमिका घ्यावी. मालक म्हणून जर आपले वर्तन राहिले तर संस्था अडचणीत येण्यास वेळ लागणार नसल्याचेही स्पस्ट मत अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँकेचे संस्थापक अध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे व्यक्त केले आहे. सध्याचे हे युग स्पर्धेचे युग आहे. स्पर्धा ही सर्वच क्षेत्रात वेगाने सुरू झाली आहे. अश्या मध्ये बँकिंग क्षेत्र हे अपवाद कसे ठरणार. ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी खाजगी संस्था जास्तीचे व मनमानी व्याजदर देण्याचे आमिष ग्राहकांना देत आहेत. या आमिषाला ग्राहक देखील मोठ्या प्रमाणावर बळी पडत आहेत. जास्तीच्या व्याज दराच्या अमिषाला बळी जाऊन ग्राहक आपली जमापुजी या संस्थामध्ये जमा करत आहेत. मात्र या ठेवी परत करण्याची जेव्हा वेळ येते त्यावेळेस मात्र संस्था आर्थिक विवंचनेत सापडल्याच्या दिसून येतात. ग्राहकांना आपल्या ठेवी वेळेवर परत

मिळत नाहीत. अशा वेळेला मात्र ग्राहकांचा हिरमोड झाल्याचे लक्षात येते व ग्राहक हा उत्तेजित होऊन संस्था व त्यांच्या संचालकांना कोसतांना आढळतो. यावेळी आपण ज्यादा व्याजदराच्या प्रलोभणाला बळी पडल्याचे त्यांच्या लक्षात येते.मात्र त्यावेळी खूप उशीर झालेला असतो. तेव्हा ग्राहकांनी आपली जमापुंजी कोणत्याही संस्थेत ठेवतांना त्या संस्थेची खातरजमा करून व ज्यादा व्याजदराला बळी न पडण्याचे आवाहन देखील अंबाजोगाई पिपल्स बँकेचे संस्थापक राजकिशोर मोदी यांनी केले आहे.

कोणत्याही संस्थाचालकांनी ग्राहकांना कर्ज देताना विचार करून कर्जपुरवठा करावा. दिलेले कर्ज योग्य व्यक्तीकडे जात आहे याची खातरजमा करावी.तसेच आपण दिलेल्या कर्जाची परतफेड व्यवस्थित पणे होत आहे याकडे देखील लक्ष केंद्रित करावे . त्यासाठी संस्थेच्या सर्व संचालक मंडळांसह संस्थेच्या कर्मचारी यांनी कसोशीने प्रयत्न करावा. कारण वसुली हा कुठल्याही आर्थिक संस्थेचा कणा असतो. तो कणा मजबूत असेल तर ती संस्था देखील मजबूत स्थिती मध्ये असते. ग्राहकांना कर्जपुरवठा करतांना संस्थेने आपल्या ठेवीच्या ६० ते ७०% एवढाच कर्जपुरवठा करावा. दिलेल्या कर्जाचा वेळेवर परतावा आला तरच पुढील ग्राहकांसाठी अर्थसहाय्य करणे संस्थेस सोईस्कर होणार असते. आणि त्यामुळेच संस्था देखील अतिशय उत्तम प्रकारे चालू शकते अशी भावना राजकिशोर मोदी यांनी यावेळी केली.

बीड: तालुक्यातील मोरगाव ग्रामपंचायत च्या उपसरपंचपदी विलास कागदे यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करताना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर समवेत विलास बडगे ,दिनकर कदम ,गणपत डोईफोडे ,नानासाहेब काकडे ,गोविंद जाधव आदि

राज्य शासनाचे लवकरच नवीन गृहनिर्माण धोरण - मंत्री अतुल सावे

मुंबई (प्रतिनिधी)

राज्यातील प्रत्येक नागरिकाला परवडणारे घर मिळावे, यासाठी राज्य शासन प्रयत्नशील आहे. याच अनुषंगाने नवीन गृहनिर्माण धोरण आखले जात आहे लवकरच नवीन गृहनिर्माण धोरण जाहीर करण्यात येणार आहे. अशी माहिती, गृहनिर्माण व इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी आज येथे दिली.

नॅशनल रिअल इस्टेट डेव्हलपमेंट कौन्सिल च्यावतीने बांद्रा-कुर्ला संकुल मध्ये देशातील सर्वात मोठे 'होमथॉन प्रॉपर्टी एक्सो' चे आयोजन करण्यात आले होते. त्याचे उद्घाटन मंत्री श्री.सावे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी नारडेकोचे अध्यक्ष संदीप रुणवाल, सचिव अभय चांडक,, माजी अध्यक्ष निरंजन हिरानंदानी, राजन बंदलकन,

अभिनेता रितेश देशमुख, जेनेलिया देशमुख, सचिन खेडेकर आदी उपस्थित होते.मंत्री श्री.सावे म्हणाले की, अन्न, पाणी, निवारा ही सर्वांची गरज असून ती पूर्ण करण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध आहे. मुंबई महानगर परिसरात जागेची मर्यादा असल्याने आम्ही झोपडपट्टी पुनर्वसन सारख्या योजना राबवत आहोत. या शिवाय मुंबईत, मुंबई मेट्रो, एमटीएचएल, मुंबई-अहमदाबाद हायस्पीड रेल्वे, सी लिंक प्रकल्प, कोस्टल रोड, धारावी पुनर्विकास प्रकल्प इत्यादीसारखे मोठे इन्फ्रा प्रकल्प सुरू आहेत. मुंबईला सर्वात विकसित शहर बनवत आहोत.

मुंबई आणि राज्यात अधिकाधिक घरे निर्माण करण्यासाठी राज्याच्या गृहनिर्माण क्षेत्रातील अनेक प्रलंबित प्रश्न नव्या गृहनिर्माण धोरणात सोडवले जातील, असे मंत्री श्री. सावे यांनी नमूद केले. नवीन धोरणासाठी विकासकांनी सूचना कराव्यात, त्यांचा नव्या धोरणात समावेश केला जाईल.म्हाडाच्या ४ हजार घरांसाठी दोन लाखांहून अधिक अर्ज आले आहेत. हे घरांची मागणी दर्शवते. भविष्यात, आम्ही गृहनिर्माण क्षेत्रात जास्तीत जास्त गुंतवणुकीची अपेक्षा करतो. म्हाडाच्या माध्यमातून बीडीडी चाळ पुनर्विकास, गिरणी कामगारांसाठी घरे, म्हाडाच्या इमारतीचा पुनर्विकास, आणि उपकर आणि उपकर नसलेल्या इमारती इत्यादी प्रमुख प्रकल्प घेतले आहेत.

शहरात जवळपास १३ हजार उपकर प्राप्त इमारती आहेत. त्यांचा पुनर्विकास करण्याची गरज आहे. येत्या काही दिवसांत जवळपास ७५हजार गिरणी कामगारांना घरे द्यावयाची आहेत, असे मंत्री श्री. सावे यांनी स्पष्ट केले. विविध विकास प्रकल्प पूर्ण करण्यासाठी ही संघटना सरकारला सहकार्य करत आहेत.

आंतरवालीतील मुख्य आरोपीची 'क्राईम हिस्ट्री'

ऋषिकेश बेदरेवर १५ गुन्हे दाखल; दरोडा, लुटमार, जुगार अड्डे, दारू विक्रीतला म्होरक्या

आंतरवाली सराटी, जालना : आंतरवाली सराटीतील दगडफेकीच्या घटनेतील प्रमुख आरोपी असलेल्या ऋषिकेश बेदरेला पोलिसांनी अटक करून, त्याच्या ताब्यातून एक गावठी पिस्तुल आणि दोन जिवंत काडतूस जप्त केली आहे. दरम्यान, त्यानंतर पोलिसांकडून सुरू असलेल्या चौकशीत आणखी गंभीर बाब समोर आली आहे.

अटक करण्यात आलेल्या आरोपीवर तब्बल १५ गुन्हे विविध पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आल्याचे समोर आले आहे. पोलिसांनी देखील यांसदर्भातील माहिती जाहीर केली.

बेदरेवर आतापर्यंत १५ गुन्हे दाखल

ऋषिकेश बेदरेचे पोलिस रेकॉर्डवरील वेगवेगळी गंभीर गुन्हे यातून समोर येत आहे. ऋषिकेश बेदरेवर २००९ ते आजपर्यंत १४ ते १५ गुन्हे दाखल आहे. बीड, जालना, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याच्या हद्दीत दरोडा, जिवे मारण्याचा प्रयत्न करणे, लूटमार, बेकायदा शस्त्र बाळगणे, दंगल करून कट रचने, अट्रोसिटी, दारू विक्रीसह जुगाराचे गंभीर गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

जालना गुन्हे शाखेने घेतले काल ताब्यात

जालन्यातील आंतरवाली सराटीमध्ये सुरू असलेल्या मराठा आंदोलनावेळी झालेल्या दगडफेकी प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता. दरम्यान, या घटनेतील प्रमुख आरोपी ऋषिकेश बेदरे याला काल जालना स्थानिक गुन्हे शाखा आणि अंबड पोलिसांनी बीड जिल्ह्याच्या हद्दीतून ताब्यात घेतले. तसेच त्याची पोलिसांनी झडती घेतली असता, त्याच्याजवळ एक गावठी कट्टा आणि दोन जिवंत काडतुस आढळून आल्याने एकच खळबळ उडाली.

मराठा आंदोलनामध्ये होता सक्रिय

विशेष म्हणजे, जीवे मारण्याच्या उद्देशाने कट रचून दगडफेक केल्याचा आरोप असलेला ऋषिकेश बेदरे मराठा आंदोलनामध्ये सक्रिय होता. या आंदोलनादरम्यान घडलेल्या दगडफेक, जाळपोळ आणि लाठीचार्जच्या घटनेनंतर तब्बल दोन महिने २५ दिवसांनी पोलिसांनी या आरोपीला अटक

केली आहे. त्याच्यासोबत असलेल्या इतर दोन साथीदारांना देखील पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहे. तर, अंबड जिल्हा व सत्र न्यायालयाच्या प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांनी तीनही आरोपींना २ डिसेंबरपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.

आंदोलनात नेमकी भूमिका काय

पोलिसांच्या या कारवाईनंतर मराठा आंदोलनातील ऋषिकेश बेदरे वर शंका उपस्थित होऊ लागल्या. याशिवाय मनोज जरांगे यांच्यासोबत या आंदोलनामध्ये सुरुवातीपासून सक्रिय असलेल्या ऋषिकेश बेदरे याची नेमकी आंदोलनात भूमिका काय होती? असा प्रश्न देखील उपस्थित होतोय.

मूळचा बीड जिल्ह्यातील गेवराई येथील ऋषिकेश बेदरेची वाळू पट्ट्यात दहशत असून, त्याच्यावर बीड, जालना, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील वेगवेगळ्या पोलिस ठाण्यात १४ गुन्हे दाखल असल्याची माहिती समोर येत आहे. यात दरोडा, मारहाण, बेकायदा शस्त्र बाळगणे, जीवे मारण्याचा प्रयत्न करणे, रस्त्यात अडवून लूट करणे, दारू विक्री, जुगार, बदनामी करणे यासह इतर अनेक कलमान्वये गुन्हे दाखल आहेत.आंतरवाली सराटीच्या मराठा क्शन आंदोलनामध्ये ऋषिकेश बेदरेचा मोठा सहभाग होता. लाठीमारच्या घटनेपूर्वी एका चॅनलकडे असलेल्या एका व्हिडिओत ऋषिकेश बेदरे छगन भुजबळांच्या विरोधात घोषणाबाजी करताना पाहायला मिळतो. याशिवाय पुढच्या संपूर्ण आंदोलनामध्ये तो मनोज जरांगे यांच्या आजूबाजूला पाहायला मिळतो. अनेक फोटोमध्ये आणि दृश्यांमधून जरांगे आणि बेदरे एकमेकांना बोलताना दिसत आहेत. तर, याच घटनेबाबत जरांगे यांची भूमिका जाणून घेण्याचा प्रयत्न केला असता, त्यांनी माध्यमांकडे प्रतिक्रिया दिली. आंतरवाली सराटी प्रकरणात पोलिसांकडून करण्यात आलेली अटक सरकारचा डाव असल्याचा आरोप जरांगे यांनी केला.

आंतरवाली सराटीच्या लाठीचार्जनंतर उद्भवलेल्या दगडफेक आणि जाळपोळीच्या घटनेमध्ये अनेक उपद्रवी लोकं घुसल्याची तक्रार मराठा नेते करत होते. तसेच, मनोज जरांगे यांनी जाळपोळ आणि दगडफेक करणारी आपले आंदोलक नसल्याचं देखील सांगितलं होतं.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT